सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब/मासलो/विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-४/९८९ ठ. क्र. ९३९ दि. २०/८/२०१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

तात-४/१८९

आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

परिवहन उपक्रमाला उर्जितावस्थेत आणण्यासाठी व सोलापूर शहरातील लोकांना प्रवासी सेवा देण्यासाठी खालीलप्रमाणे तातडीने निर्णय घेण्यांत येत असून. मा.आयुक्तांनी या निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी ही सभा निर्देश देत आहे.

१) सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी पुर्ण वेळ परिवहन व्यवस्थापकांची नियुक्ती होणे आवश्यक असल्याने मा.श्रीकांत मायकलवार उप आयुक्त यांचेकडे पुर्णवेळ परिवहन व्यवस्थापक पदाचा पदभार देण्यास मान्यता देणेत येत आहे.
२) मा.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी पाठविलेल्या अहवालात नमूद केलेल्या मुद्यांचा विचार करुन अशोक लेलँड कंपनीच्या विरुध्द तातडीने दिवाणी व फौजदारी कायदेशीर कारवाई करण्यांत यावी.
३) शहरातील मा.खासदार, मा.आमदार व मंत्री महोदयांची भेट घेऊन महाराष्ट्र राज्याचे मा.ना. मुख्यमंत्री व परिवहन खात्याचे मंत्री यांचेबरोबर तातडीने बैठक लावून या प्रश्नांचा निर्णय घ्यावा.
४) अशोक लेलँड या कंपनीने ज्या बसेस सोलापूर महानगरपालिकेस दिलेल्या आहेत त्या जेएनएनयुआरएम योजनेमधून दिल्या असल्याने केंद्र सरकारमधील संबंधित खात्याशी मा.आयुक्त यांनी तातडीने संपर्क साधावा व सद्यस्थितीची माहिती त्यांना द्यावी. या संदर्भात मा.पदाधिकारी व मा.महापौर, मा.आयुक्त यांनी दिल्ली येथे संबंधित विभागाशी संपर्क साधून केंद्रिय मंत्री आदरणीय मा.ना. नितीन गडकरी यांचेशी संपर्क साधून त्यांची वेळ व तारीख घ्यावी. व केंद्रिय मंत्री मा.ना.नितीन गडकरीसाहेब यांचे उपस्थितीत संबंधित विभागाची बैठक लावणेबाबतची विनंती करावी.
५) जे अधिकारी व कर्मचारी कामचुकारपणा किंवा भ्रष्टाचार करतील व ज्यांच्यावर गैरकृत्याचे आरोप आहेत अशा अधिकारी व कर्मचा-यांच्या विरुध्द कडक कारवाई करण्यांत यावी.
६) कर्मचारी भरती (वरीष्ठ पदे, सुरक्षा रक्षक, अनुकंपा )इत्यादी मध्ये झालेल्या गैर प्रकाराची चौकशी करुन कारवाई करावी.
७) बस क्यु शेड व जाहिराती व इतर उत्पन्नवाढी संदर्भातील प्रकरणात लक्ष घालून अधिक उत्पन्न कसे वाढेल या संदर्भात निर्णय घ्यावा.
८) बस खाते उर्जितावस्थेत आणण्यासाठी व उत्पन्न वाढीसाठी योग्य त्या सूचना व शिफारशी करणेत याव्यात.
९) परिवहनच्या स्क्रॅप विक्रीसाठी काढण्यांत आलेले टेंडर त्याद्वारे विकलेला माल व त्यामध्ये झालेली कार्यवाही यात झालेला गैरव्यवहार याबाबतची संपूर्ण चौकशी होऊन त्याचा अहवाल सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यांत यावा.
१०) परिवहन खात्यामध्ये झालेल्या चो-या हयाबद्दलची जबाबदारी निश्चित करुन त्यांचा अहवाल सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यांत यावा.
११) महानगरपालिकेचे परिवहन विभागावर नियंत्रण असावे या दृष्टीकोनातून उपसमिती नियुक्त करणेत येत असून, त्यामध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील.
    १) मा. सभापती, परिवहन समिती
    २) मा. पद्माकर केशव काळे
    ३) मा. मौलाली बाशूमियॉं सय्यद
    ४) मा. उदयशंकर महादेव चाकोते
    ५) मा. सुर्यकांत सदाशिव पाटील
    ६) मा. अशोक चंद्रशेखर निंबर्गी
    ७) मा. भिमाशंकर बाबूराव म्हेत्रे
    ८) मा. माशप्पा सिद्रामप्पा विटे

वरीलप्रमाणे उपसमितीने आठवडयातून एक बैठक घेऊन आपल्या सूचना व शिफारसी सर्व साधारण सभेकडे पाठवाव्यात.

वरीलप्रमाणे ठरावाची अंमलबजावणी सत्वर करण्यांत यावी.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका